सर्वसामान्य नागरिक व शेतकरी यांना शेतीसाठी/पिण्याच्या पाण्यासाठी / ड्रेनेजसाठी जलवाहिन्या टाकण्याकरिता रस्ते ओलांडणी बाबत (रोड क्रॉसिंग) खोदकामासाठी परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-०६९६/प्र.क्र.१५७/रस्ते-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: २३/३/२०००.

<u>परिपत्रक</u>

सर्वसाधारण नागरिकांसाठी नियमांचे सुलभीकरण व सुसुत्रीकरण करण्याच्या दृष्टीने रस्ते ओलांडणीबाबत खोदकामासाठी परवानगी देण्याबाबत सर्वसाधारण व समान धोरण लावण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पुढे नमूद केल्यानुसार सूचना देण्यात येत आहेत. या सूचना जिल्हा परिषदांच्या देखभालीतील रस्त्यांना देखील लागू राहतील.

(१) रस्ता खोदून पाईप लाईन टाकण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमूना सर्व अटी व शर्तीसह परिपूर्ण असावा. या अर्जाची प्रत अर्जदारांना उपलब्ध करण्यात यावी.

(२) मुरुम, माती व खडीच्या रस्त्यातून पाईप लाईन टाकण्यासाठी परवानगीचे अधिकार उप अभियंता यांना प्रदान करण्यात येत आहेत. डांबरी रस्त्यातून व पदपथातून पाईप लाईन टाकण्यासाठी परवानगीचे अधिकार कार्यकारी अभियंता यांचेकडे राहतील.फक्त कॉन्क्रीट रस्त्यातून व पदपथातून पाईप लाईन टाकण्यासाठी परवानगीचे अधिकार मुख्य अभियंत्यांना राहतील. अर्जदाराने विहीत अर्जाची प्रत स्वतंत्रपणे पण एकाचवेळी कनिष्ठ अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता व आवश्यकतेनुसार मुख्य अभियंता यांना सादर करावी.

(३) परवानगी बाबत दिरंगाई टाळण्यासाठी उपअभियंता/कार्यकारी अभियंता यांनी दर पंधरवड्याला मुख्यालय दिनापैकी एक दिवस ठरवून त्या दिवशी प्राप्त अर्जाची छाननी करून परवानगी देण्यासंबंधी कार्यवाही करावी. अर्ज प्राप्त झाल्यानंतर एका महिन्याचे आत अर्जदारास उत्तर देण्याची जबाबदारी वर उल्लेखिलेल्या सक्षम अधिकाऱ्यांची राहिल.

(४) पाईप लाईन रस्त्याच्या पृष्ठभागाच्या कमीतकमी ६० से.मी. खोलीवर असाव्यात. (राष्ट्रीय महामार्गाबाबत भूतल परिवहन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे परीपत्रक क्र. एनएच ३/पी/६६/७६, दिनांक १९ नोव्हेंबर १९७६ चे अनुपालन करावे).

(५) रस्त्याखाली जलवाहिनी टाकण्यापूर्वी त्याच्या पेक्षा मोठ्या व्यासाचा (कमीतकमी १५ से.मी. व्यासाचा कॉक्रीट अगर आवश्यक व्यासाचा स्टील) एनकेसींग पाईप टाकावा.

(६) खोदलेल्या चरात पाईप व एनकेसींग पाईप टाकल्यानंतर तो चर खोलीसाठी मोठ्या अगर लहान खडीनेच भरण्यात यावा. त्यात माती वापरण्यात येऊ नये.

(७) रस्ते ओलांडणीसाठी (रोड क्रॉसिंग) रस्ता पूर्ववत करण्यासाठी आकारण्यात येणा-या रक्कमेचे सध्याचे दर संपूर्ण राज्यासाठी पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | रस्त्याचा प्रकार | राष्ट्रीय महामार्ग/राज्यमार्ग/ शहरातील. रस्ते यराच्या लांबीसाठी. (रु. प्रती मीटर) | इतर रस्ते. (रु. प्रती मीटर) यराच्या लांबीसाठी. |
|---|---|---|---|
| १. | डांबरी रस्ता | १२००/- | १०००/- |
| २. | खडीचा रस्ता | ६००/- | ५००/- |
| ३. | मुरुम साईडपट्ट्या | २५०/- | २५०/- |
| ४. | रस्त्याच्या बाजूची जमीन | ६०/- | ६०/- |
| ५ | [illegible] लावलेले पदपथ (फुटपाथ) | १२००/- | १२००/- |

सदरहू दर दिनांक १/४/२००० पासून अंमलात येतील. यानंतर दर ५ वर्षानंतर वरील दरात सुधारणा करण्यात येईल. सदरहू रक्कम महसुली जमा "००५९ सार्वजनिक बांधकामे " या शीर्षाखाली जमा करण्यात यावी.

(८) परवानगी प्राप्त झाल्यानंतर अर्जदारांनी रस्ता खोदून पाईप लाईन टाकताना पूर्ण दक्षता घ्यावी व वाहतुकीस अडथळा/गैरसोय होणार नाही आणि अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदारावर राहिल, अशी हमी अर्जदाराकडून अर्जासोबत घ्यावी.

(९) या संबंधी सार्वजनिक बांधकाम नियमावलीतील परिशिष्ट २३ व परिच्छेद ३२१ येथील सर्व तरतुदी लागू राहतील. राष्ट्रीय महामार्गाबाबत क्रमांक ४ येथे उल्लेख केलेल्या परिपत्रकातील सर्व अटीसुध्दा लागू राहतील.

वरील सूचनांची अंमलबजावणी तातडीने होईल याची दक्षता घ्यावी.

सदर आदेश ग्राम विकास विभाग (अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७८१, दिनांक १५/११/९७) व वित्त विभाग (अनौपचारिक संदर्भ १६५/२०००, दिनांक १/३/२०००) यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

(स्वाक्षरी) २३-३-२०००

(दा. व. साठे),
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

क्र.का.२अ/परिपत्रक/ 2050
मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग,
पुणे यांचे कार्यालय
30 MAR 2000

प्रत अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ, पुणे/सातारा/
कोल्हापूर/सोलापूर यांस माहितीसाठी व त्वरित आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

प्रत या कार्यालयातील स.मु.अ. राप/नियोजन, उ.अ. सा.बा./पुणे/नियोजन, प्रशासक
यांस माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी
प्रत या कार्यालयाचे संकीर्ण लिपिक यांस

(स्वाक्षरी)
करिता, मुख्य अभियंता
सा.बां. प्रादेशिक विभाग पुणे